




सायं. दैनिक

# सार्व मंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२

इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा www.sarvmanthan.in





१८ ऑक्टोबर



। अहिल्यानगर । वर्ष ४ थे । अंक ९३९ वा । बुधवार, ३० एप्रिल २०२५ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।


## ।।निवेदन।।

उद्या गुरुवार दि. १ मे रोजी महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त दैनिक सार्व मंथन कार्यालयास सुट्टी असल्याने दि. १ मे रोजी अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

– कार्यालयीन व्यवस्थापक

# भारतीय सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य

**सार्व मंथन**
नवी दिल्ली ३० । वृत्तसंस्था



। मोदींच्या निवासस्थानी आज ४ उच्चस्तरीय बैठका
। पुढचे काही तास महत्त्वाचे

**पहलगाम येथील हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे दिल्लीतील वातावरण चांगलेच तापले आहे. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी दिल्लीत मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी बैठकांवर बैठका सुरू आहेत.**

काल रात्रीही मोदींच्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीला संरक्षण दलाचे प्रमुख, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, केंद्रीय गृहमंत्री आणि संरक्षण मंत्रीही उपस्थित होते. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही मोदींची भेट घेऊन पहलगाम हल्ल्यावर चर्चा केली. त्यानंतर आता पुन्हा एकदा मोदींच्या निवासस्थानी बैठक होत आहे. ही बैठक निर्णायक मानली जात आहे. भागवत यांच्या मोदी भेटीनंतरच्या या बैठकीला अत्यंत महत्त्व आलं असून या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पुढचे काही तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मानले जात आहे.

भारताने अतिरेक्यांचा सफाया करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय सैन्याला फ्रि हँड दिला आहे. तुम्ही टार्गेट ठरवा आणि वेळ ठरवा असं मोदींनी सैन्याला स्पष्ट केले आहे. तसेच निर्णय घेण्याचे अधिकारही मोदींनी सैन्याला दिले आहेत. त्यामुळे युद्धाचे ढग जमू लागले असून मोदींच्या या निर्णयामुळे पाकिस्तानचे धाबे दणाणले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आज एकूण चार हाय लेव्हल बैठका होणार आहेत. यातील एक बैठक ११ वाजता सुरू झालीय. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि भाजपचे नेते जेपी नड्डाही उपस्थित राहणार आहेत.

मोदींच्या निवासस्थानी आधी ११ वाजता कॅबिनेट सुरक्षा समितीची बैठक होईल. त्यानंतर मोदींच्या अध्यक्षतेत CCPA ची बैठक होईल. त्यानंतर आर्थिक प्रकरणाची कमिटीची तिसरी बैठक होणार आहे. नंतर शेवटची आणि चौथी बैठक कॅबिनेटची होणार आहे. या तिन्ही बैठकांमध्ये निर्णय घेतल्यानंतर कॅबिनेटमध्ये त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले जाणार आहे.

### निर्बंध लादणार?

या चारही बैठकांमध्ये पाकिस्तानवर युद्ध करण्यापासून ते पाकिस्तानवर आणखी कोणते आर्थिक निर्बंध लादता येईल याचीही चर्चा केली जाणार आहे. तसेच युद्ध झाल्यास देशावर त्याचा काय परिणाम होऊ शकतो आणि अशा प्रसंगात भारताच्या बाजूने कोण कोण राहू शकतात याच्यावरही चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच आज पुढचे काही तास अत्यंत महत्त्वाचे आणि निर्णायक असणार आहेत.

## गौण खनिज उत्खननावर नियंत्रण न ठेवल्याने
# तहसीलदार निलंबित
### जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

**सार्व मंथन**
सोलापूर ३० । वृत्तसंस्था

उजनी धरण कार्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक सुरू असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधितांची विभागीय चौकशी प्रस्तावित करून माढ्याचे तहसीलदार विनोद रणवरे यांच्या विरूध्द निलंबनाची कारवाई करण्यासंबंधीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर केलेला होता. त्यावर तहसीलदार रणवरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

माढा तालुक्याचे तहसीलदार विनोद रणवरे यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंधात्मक कारवाई तसेच गौण खनिज विषयक बाबींमध्ये करावयाची विहित मुदतीतील कारवाई असमाधानकारक असल्याचे निर्देशनास आले होते. माढा तालुक्यातील उजनी धरण कार्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक सुरू असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने १३ फेब्रुवारी रोजीच्या पत्रान्वये संबंधितांची विभागीय चौकशी प्रस्तावित करून तहसीलदार माढा रणवरे यांच्या विरोध निलंबनाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता.


## पाहिजेत
**सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी**
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
**न्युज रिपोर्टर व कॅमेरामन**
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
**दै. सार्व मंथन कार्यालय,**
शिव चिंदबर कार्यालयाजवळ, बारागाव नांदुर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072






२० फेब्रुवारी २५


# राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आणि सण अग्रीम वाढला

**सार्व मंथन**
नवी दिल्ली ३० । वृत्तसंस्था

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता नुकताच वाढवण्यात आला. केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्के करण्याचा निर्णय झाला असून ही महागाई भत्ता वाढ जानेवारी २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. मार्च महिन्यात सरकारने या महागाई भत्ता वाढीबाबतचा निर्णय घेतला.

म्हणजेच केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांची महागाई भत्ता फरकाची रक्कम सुद्धा मिळाली. दरम्यान केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढीचा निर्णय झाल्यानंतर आता देशातील विविध राज्य शासनाच्या माध्यमातून तेथील राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढवला जातोय.

खरे तर एक जानेवारी २०२५ पासून केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता २% ने वाढवण्यात आला असून याबाबतचा निर्णय मार्च महिन्याच्या शेवटी घेण्यात आला.

## डॉ. तनपुरे साखर कारखाना निवडणूक,
# सात उमेदवारी अर्ज बाद

**सार्व मंथन**
राहुरी ३० । प्रतिनिधी

तनपुरे साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या १८० अर्जांची मंगळवारी छाननी करण्यात आली. यामध्ये ७ अर्ज बाद करण्यात आले. त्यामुळे आता १७३ उमेदवारांचे अर्ज वैध झाले आहेत.

डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी येत्या ३१ मे २०२५ रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या दिवशी १ जून मतमोजणी प्रक्रिया होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. काल १८० अर्जांची छाननी करण्यात आली. यात सर्वसाधारण मतदारसंघात एकाच गटात दोन नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवाराचे एक

नामनिर्देशन पत्र वैध करण्यात आले. दुसरे अतिरिक्तनामनिर्देशनपत्रबाद करण्यात आले. त्यामध्ये



सर्वसाधारण मतदारसंघात ज्या विलास भागवत गागरे (कोल्हार गट), युवराज सुधाकर तनपुरे (वांबोरी गट), अरुण बाबुराव तनपुरे (राहुरी गट) या तीन जणांचे अतिरिक्त अर्ज बाद करण्यात आले.

तसेच महिला प्रतिनिधी मतदारसंघात प्रमिला अनिल शिरसाठ यांनी दोन अर्ज दाखल केले होते. त्यांचेही एक बाद करून एक नामनिर्देशन पत्र वैध करण्यात आले. गटात नामनिर्देशन पत्र दाखल केले, त्याच गटातील सूचक व अनुमोदक असावेत, असा नियम होता. परंतु राजू सयाराम पोटे (टाकळीमिया गट) व विश्वनाथ भानुदास दुशिंग (वांबोरी गट) यांनी दुसऱ्या गटातील सूचक व अनुमोदक घेतल्याने त्यांचे नामनिर्देशन पत्र बाद करण्यात आले.

भटक्या विमुक्त जाती जमाती व विशेष मागासवर्ग मतदारसंघातील उमेदवार दिलीप लालगिर गोसावी यांनी नामनिर्देशन पत्रासोबत जातीचा दाखला जोडला नव्हता. त्यामुळे त्यांचे नाम निर्देशन पत्र बाद करण्यात आले.

### राहुरी बाजार समिती कादा आवक भाव

| | |
|---|---|
| आवक | २०३८२ |
| नं. १ कांदा | ९०० ते १३०० |
| नं. २ कांदा | ५०० ते ९०० |
| नं. ३ कांदा | १०० ते ५०० |
| गोल्टी | १०० ते ८०० |
| एक्स्ट्रा सुपर क्वॉलिटी | १३८५ |

### संत मराठी

ज्ञानेश्वर माऊली
मराठीची सावली
पसायदान मागता
सारस्वता भावली

मुक्ताईचे कवितेत
बहिण गोड द्रवली
ताटी उघडा ज्ञाना
आर्त साद घातली

नाम्याच्या अभंगी
विठू रुपा जेवली
गोरोबाच्या शब्दां
चिखलात नाचली

तुक्याचे अभंगात
इंद्रायणी भिजली
मिराईच्या भजनी
विषामृता रुजली

मनाच्या श्लोकांत
दिशा ती दिसली
रामदासाचीकाठी
नाठाळास बसली

जनाबाई अभंगी
घरकामात दंगली
कबीरा दोह्यामधे
कविता रे रंगली

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# प्रदुषणामुळे मासेमारीला फटका
### मत्स्य आणि उद्योग विभागांनी दखल घ्यावी : प्रा. शिंदे

**सार्व मंथन**
मुंबई ३० । वृत्तसंस्था

राज्यातील मुंबई, ठाणे, बेलापूर, उलवे, तळोजा येथील खाड्यांमध्ये औद्योगिक क्षेत्रामधून सोडण्यात येणारे सांडपाणी आणि डंम्पिंग ग्राऊंडचा कचरा यामुळे प्रदूषण वाढत असून त्याचा फटका मासेमारी व्यवसायाला बसत आहे. याबाबत पर्यावरण, मत्स्यव्यवसाय आणि उद्योग विभागांनी दखल घ्यावी आणि यासंदर्भातील संशोधन संस्थांच्या मदतीने विषयतज्ज्ञांचा



समावेश असलेली अभ्यास समिती सात दिवसाच्या आत स्थापन करुन एक महिन्यात अहवाल द्यावा जेणेकरुन हे प्रदूषण रोखता येईल. असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

काल दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील ०५ मार्च, २०२५ रोजीच्या यासदंर्भातीलविधानपरिषदेतील लक्षवेधीबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते.

विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड, विक्रांत पाटील, अॅड. निरंजन डावखरे, प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.८८ संदर्भातील चर्चेप्रसंगी सभापती महोदयांनी निर्देश दिले होते.

## पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या नातेवाईकांना
# ५० लाख आणि सरकारी नोकरी
### देवेंद्र फडणवीसांच्या कॅबिनेटचा मोठा निर्णय

**सार्व मंथन**
मुंबई ३० । वृत्तसंस्था

जम्मू-काश्मिरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २७ पर्यटकांचा मृत्यू झाला. या मृतांमध्ये ६ महाराष्ट्रातील नागरिकांचा समावेश आहे. या हल्ल्यामुळे संपूर्ण देशाला मोठा हादरला बसला आहे. या हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र सरकारने मोठं आर्थसहाय्य केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत मोठी घोषणा केली. पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपये आणि कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नोकरी देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आज राज्य मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्यू झालेल्या महाराष्ट्रातील ६ जणांच्या कुटुंबीयांना अर्थसहाय्य करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीमध्ये पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याची घोषणा केली. मृतांच्या कुटुंबीयांच्या शिक्षण आणि रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पहलगाम हल्ल्यातील मृतांना राज्य मंत्रिमंडळ बैठकीत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. महाराष्ट्रातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले की, 'या कुटुंबांच्या शिक्षण, रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार आहोत.

## राहुरीच्या बस स्थानकासमोर तीन
# भामट्यांनी अपंग तरुणाला लुटले
### राहुरी पोलीसत ३ अज्ञात भामट्यांविरोधात गुन्हा दाखल

**सार्व मंथन**
राहुरी ३० । शहर प्रतिनिधी

राहुरी शहरातील बस स्थानक समोर मोटारसायकलवर आलेल्या तीन भामट्यांनी निलेश धिवर या अपंग व्यक्तीचा मोबाईल व रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावुन नेली. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली.

निलेश रघुनाथ धिवर, वय ४३ वर्षे, रा. शनिमंदिर रोड, खंडोबा चौक, ता. राहाता, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, निलेश धिवर हे कामा निमित्त राहुरी येथे आले होते. त्यांचे काम झाल्यानंतर ते रात्री ११ वाजता राहता येथे जाण्यासाठी राहुरी बस स्थानक समोर गाडीचे वाट पहात होते.

तेथे एक अनोळखी इसम धिवर यांच्या जवळ गेला त्याने फोन लावण्यासाठी मोबाईल मागितला. तेव्हा धिवर यांनी माझेकडे बॅलन्स नाही, असे त्याला सांगितले. त्यावेळी तेथे मोटारसायकलवर आणखी दोन अनोळखी इसम आले. ते म्हणाले कि, तुझे काय नाटक चालू आहे. असे बोलून त्यांनी धिवर यांच्या खिशातील मोबाईल बळजबरीने काढून घेतला त्या मोबाईलच्या पाठीमागे कव्हरमध्ये त्यांचे आधारकार्ड व हँडिकॅप कार्ड होते तसेच १ हजार ४५० रूपये रोख रक्कम होती.

या घटने बाबत निलेश रघुनाथ धिवर यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात तीन भामट्या विरोधात गुन्हा रजि. नं. ४७३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पेगासस हेरगिरी अहवाल सार्वजनिक करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**सार्व मंथन**
नवी दिल्ली ३० । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने पेगासस हेरगिरी अहवाल सार्वजनिक करण्यास नकार दिला आहे. देशाच्या सुरक्षेशी आणि सार्वभौमत्वाशी संबंधित कोणताही अहवाल उघड केला जाणार नाही, असे मंगळवारी न्या.सूर्यकांत आणि न्या. एन कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठाने म्हटले.

या अहवालातील वैयक्तिक शंका दूर करता येतील पण तांत्रिक समितीच्या अहवालावर रस्त्यावर चर्चा करता येणार नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे. माहिती किती प्रमाणात शेअर केली जाऊ शकते, हे तपासावे लागेल, असेही न्यायालयाने म्हटले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी ३० जुलै रोजी होईल.२०२१ मध्ये, एका पोर्टलने त्यांच्या अहवालात दावा केला होता की केंद्र सरकारने २०१७ ते २०१९ पर्यंत पेगासस स्पायवेअरद्वारे सुमारे ३०० भारतीयांची हेरगिरी केली. यामध्ये पत्रकार, वकील, सामाजिक कार्यकर्ते, विरोधी पक्षनेते आणि व्यापारी यांचा समावेश होता. ऑगस्ट २०२१ मध्ये हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. ऑक्टोबर २०२१ मध्ये, न्यायालयाने चौकशीसाठी निवृत्त न्या. आर.व्ही. रवींद्रन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीचा अहवाल ऑगस्ट २०२२ मध्ये आला. त्यात म्हटले होते की, त्यांनी तपासलेल्या २९ फोनपैकी पेगाससचे कोणतेही पुरावे सापडले नाहीत, परंतु त्यापैकी ५ फोनमध्ये मालवेअर आढळले. याचिकाकर्त्यांचे वकील श्याम दिवाण यांनी २२ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात हा मुद्दा उपस्थित केला होता.



## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# ऐक्याची नांदी

'धर्म पूछ पूछ कर मारा', हे वाक्य इलेक्ट्रॉनिक मीडियात इतक्या वेळा उच्चारले गेले की त्यातून नेमका काय विस्फोट होईल याची चिंता सर्वांनाच लागून राहिली होती. पण सुदैवाची बाब अशी की या घटनेच्या आधारे धार्मिक विद्वेष पसरवण्याच्या प्रयत्नांना सर्वांनीच एकजुटीने पायबंद घातला. भारताची नेमकी ओळख काय आहे हे यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. देशातल्या तमाम मुस्लीम संघटनांनी या हत्याकांडाचा रस्त्यावर येऊन निषेध केला. रझा अकादमीसारख्या संघटनांचाही यात समावेश होता. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी मशिदींमध्ये शुक्रवारच्या नमाजाच्या वेळीही या हत्याकांडाचा तीव्र निषेध करून हल्लेखोरांची निर्भत्सना करण्यात आली. हे सगळे होत असताना काश्मिरातील पर्यटकांच्या बाबतीत तेथील स्थानिक मुस्लीम नागरिकांनी नेमका काय प्रतिसाद दिला याचेही शेकडो व्हिडिओ गेल्या चार दिवसांत सोशल मीडियावर प्रसारित झाले आहेत. यात पुण्यातल्या पर्यटकांनी सांगितलेल्या अनुभवांचे पण परिणामकारक व्हिडिओ आहेत.प्रत्येक सामान्य काश्मिरी नागरिक या हत्याकांडामुळे मुळापासून हादरलेला दिसला, त्यातून स्वतःला सावरत या काश्मिरी नागरिकांनी सर्व पर्यटकांना सर्वपरीने मदतीचा हात दिला. घटनास्थळावरून भयभीत होऊन परतणार्या पर्यटकांना आपल्या खांद्यावर घेऊन हे स्थानिक नागरिक मदत करताना आढळले. ठिकठिकाणी पर्यटकांचे जे जथ्थे जमले होते, त्यांना चहापाणी, जेवण नाश्त्यापासून सर्व सुविधा स्थानिक मुस्लीम नागरिकांनी आपुलकीने पुरवल्या. एवढेच नाही तर अनेक स्थानिकांनी, महिला व मुलांना आपल्या घरात आश्रय देऊन सुरक्षितता प्रदान केली. काश्मिरातून माघारी परतू इच्छिणार्या पर्यटकांना या स्थानिक नागरिकांनी आपल्या वाहनांमधून विमानतळ आणि रेल्वे स्थानकावर मोफत सोडण्याची व्यवस्था केली.काश्मिरी नागरिकांविषयी आजवर जी कथानके रचली गेली किंवा जाणीवपूर्वक रुजवली गेली त्या सर्व कथानकांना या निमित्ताने मूठमाती मिळाली आहे. काश्मिरी नागरिकांमधली काश्मिरीयत किती विलोभनीय होती याचे दाखले तेथून परतलेल्या पर्यटकांनी आपल्या व्हिडिओद्वरे दिल्याने काश्मीरविषयी सर्वसामान्य भारतीयांमध्ये पुन्हा एक आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे, हे व्हिडिओ संदेश समाजात एक वेगळेच विधायक वातावरण निर्माण करणारे ठरले आहेत. देशात सगळीकडे हे चित्र असताना काही ठराविक वृत्तवाहिन्यांनी मात्र याची परिणामकारक दखल घेतलेली दिसली नाही. हा एक प्रकारे समाजविघातकपणाच म्हणावा लागेल. देशात धार्मिक सलोखा आणि ऐक्य निर्माण झाले तर ज्यांची राजकीय दुकाने बंद होणार आहेत ते धास्तावणे साहजिक आहे, त्यामुळे त्यांनी त्यांच्या परीने त्यांचा अजेंडा रेटण्याचाच प्रयत्न चालवला असला तरी त्याला इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी बळी पडायचे कारण नव्हते. हल्लेखोर पाकिस्तानी होते आणि हा हल्ला करताना भारतात धार्मिक विद्वेष निर्माण व्हावा आणि त्यातून यादवी युद्धासारखी स्थिती निर्माण व्हावी असा त्यांचा अंतस्थ हेतू होता. त्यामुळेच त्यांनी पहिल्यांदा काही जणांना धर्म विचारून त्यांची हत्या केल्याचा प्रकार घडला आहे. त्यांचा हा अंतस्थ डाव ओळखून संपूर्ण देशवासीय एकजुटीने या आव्हानाचा संयमाने मुकाबला करत असताना दुर्दैवाने काही विशिष्ट विचारसरणीचे लोक आणि त्यांना साथ देणारा इलेक्ट्रॉनिक मीडिया अतिरेक्यांचाच हेतू साध्य व्हावा यासाठी प्रयत्न करताना दिसला, पण त्यातूनही देशातले नागरिक बिथरले नाहीत आणि त्यांनी आपसातले सौहार्द बिघडू दिले नाही. हा एक वेगळाच भारत या निमित्ताने सार्या जगाला पाहायला मिळाला आहे. या हत्याकांडामुळे भारतातील नागरिकांमध्ये काश्मीरविषयी धास्तीचे वातावरण निर्माण होणार आणि त्यातून काश्मिरास जाणारा पर्यटकांचा ओघ आपोआप कमी होणार हे अगदी साहजिक आहे.पण उलट आता काश्मिरी नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद्यांचे मनसुबे हाणून पाडण्यासाठी, मुद्दाम काश्मीर दौरा करण्याचे आवाहन पर्यटकांना केले जाऊ लागले आहे. अतुल कुलकर्णी नावाच्या एका अभिनेत्याने या हत्याकांडानंतर मुद्दाम काश्मीरचा दौरा करून तिथून जे व्हिडिओ संदेश जारी केले ते दिलासाजनक आहेत. पर्यटकांच्या अभावी काश्मिरच्या स्थानिक जनतेची उपासमार व्हावी, त्यांची रोजीरोटी बंद व्हावी आणि ते पुन्हा विघटनवादाच्या मार्गावर यावेत असा हल्लेखोरांचा स्पष्ट इरादा होता आणि तो न ओळखता येण्याइतके भारतीय नागरिक दूधखुळे नाहीत.त्यामुळे जर भारत विरोधी शक्तींचे मनसुबे हाणून पाडायचे असतील तर आता मुद्दामहून, न घाबरता देशप्रेमी जनतेने काश्मिरातील पर्यटकांचा हा उरलेला सीझन वाया जाऊ देता कामा नये. देशावर जेव्हा जेव्हा संकट येते तेव्हा तेव्हा हिंदू-मुस्लीमच नव्हे तर सर्वच जाती-धर्माचे लोक भारतीय म्हणून एकत्र येत असतात आणि तीच आपल्या देशाची खरी ओळख आहे. ही ओळख पुन्हा जगाला नव्याने पटवण्याचे काम पहलगाम घटनेनंतर घडले आहे.

# रुग्णालय व न्यायालयाच्या इमारतीचे कामे पूर्ण करा

## उपजिल्हा रुग्णालय व न्यायालयाच्या इमारतीच्या कामाचा आ. काळेंनी घेतला आढावा

**सार्व मंथन**
**कोपरगाव ३० । प्रतिनिधी**

आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघाच्या विकासाला गती देतांना कोपरगाव शहरातील अनेक महत्वाच्या शासकीय कार्यालयांच्या इमारतींना देखील निधी दिला आहे. यामध्ये दिवाणी न्यायालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण पोलीस स्टेशन व कर्मचारी वसाहत, पंचायत समिती इमारत आदी इमारतींचा समावेश असून या सर्व इमारतींचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. त्यापैकी दिवाणी न्यायालय, उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची आ.आशुतोष काळे यांनी पाहणी केली. काम वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे त्याचबरोबर कामाची गुणवत्ता आणि दीर्घकाळ टिकणारी सुविधा असणंही तेवढंच गरजेचं असल्याचे सांगत कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



यावेळी त्यांनी सांगितले की, माजी आमदार अशोकराव काळे यांनी कोपरगाव ग्रामीण रुग्णालयासाठी निधी देवून ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून कोपरगावची आरोग्य व्यवस्था सुरळीत केली परंतु त्यावेळी उपजिल्हा रुग्णालय राहून गेले होते. परंतु कोविडच्या काळात उपजिल्हा रुग्णालयाची किती गरज आहे हे सर्वांनी अनुभवले आहे.

आपल्यापासून जिल्हा रुग्णालय जवळपास १०० किलोमीटर पेक्षा जास्त दूर असल्यामुळे सर्वसामान्य रुग्ण जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी जावू शकत नव्हते. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची होणारी अडचण दूर करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची उणीव भरून काढत अथक प्रयत्नातून उपजिल्हा रुग्णालयाला मजुरी मिळवित २८.८४ कोटी रुपये निधी उपजिल्हा रुग्णालयास मिळविला आहे. हे उपजिल्हा रुग्णालय सर्वसामान्य रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे.त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण होवून नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी माझे या कामावर बारीक लक्ष आहे. काम करण्यासाठी मुबलक जागा असून वेगाने काम करून पावसाळ्यापूर्वी बहुतांशी काम पूर्ण करून दिलेल्या मुदतीत उपजिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण करा.

दिवाणी न्यायालयाच्या इमारतीसाठी दिलेल्या ३८.६३ निधीतून मागील एक वर्षापासून काम सुरु आहे.

# यात्रेत झालेल्या वादातून तरुणावर तलवार व कोयत्याने वार

**सार्व मंथन**
**वळण ३० । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील तिळापुर येथे यात्रेत झालेल्या किरकोळ बाचाबाचीमुळे एका जमावाने काल दि. २८ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास भिष्मराज रोठे यांच्या कुटुंबावर शसस्त्र हल्ला केला. यावेळी कोयता व तलवारीने वार करून लाकडी दांडा व लोखंडी गजाने मारहाण करुन रोठे यांच्या घरावर दगडफेक करुन नुकसान केले.

भिष्मराज सोपान रोठे, वय ३२ वर्षे, रा. तिळापुर, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, भिष्मराज रोठे यांचे राजेंद्र गरदरे याच्या सोबत तिळापुर गावचे यात्रेमध्ये किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यानंतर काल दि. २८ एप्रिल २०२५ रोजी रात्री ७.४५ वाजे दरम्यान भिष्मराज रोठे हे त्यांच्या घरात असताना तेथे आरोपी आले. आणि त्यांनी भिष्मराज रोठे यांना शिवीगाळ करुन म्हणाले कि, तु आमचे नादी लागतो काय? आज तुला जीवंत सोडणार नाही, असे म्हणून आरोपींनी भिष्मराज रोठे व त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांवर कोयता व तलवारीने वार करून लाकडी दांडा व लोखंडी गजाने बेदम मारहाण केली. तसेच रोठे यांच्या घरावर दगडफेक करुन मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. व राजाबाई यांचे गळ्यातील सोन्याचे मनी असलेले डोरले तोडुन नुकसान केले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अशोक शिंदे पोलिस नाईक दिपक फूंदे, बापू सोनटक्के, चालक लक्ष्मण खेडकर आदि पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत आरोपी पसार झाले होते. या घटनेत दोघेजण किरकोळ तर दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

भिष्मराज सोपान रोठे यांच्या फिर्यादीवरून आरोपी राजेंद्र नामदेव गरदरे, सोपान होडगर, किरण गोविंद बाचकर, विजय नामदेव गरदरे, एकनाथ थोरात, सतिष संजय कोळेकर, संजय बिरु कोळेकर, विठ्ठल नानासाहेब गरदरे, सर्व रा. तिळापुर, ता. राहुरी, या आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अशोक शिंदे हे करीत आहेत.

# अपहार करणारा ग्रामसेवक सेवेतून बडतर्फ

**सार्व मंथन**
**अकोले ३० । प्रतिनिधी**

अकोले तालुक्यातील समशेरपूर/देवठाण ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी राजेंद्र किसन वर्पे यांना सेवेत गैरवर्तन व गैरव्यवहार केल्याप्रकरणी सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. वर्पे यांची विरोधात करण्यात आलेल्या विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेले सातही दोषारोप सिद्ध झालेली त्यांच्यावर मंगळवार (दि.२९) रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी बडतर्फीची कारवाई केली.

ग्रामसेवक वर्पे यांनी समशेरपूर/देवठाण ग्रामपंचायतमध्ये २०१७-१८, २०१९- २० आणि २०२०-२१ या वेगवेगळ्या आर्थिक वर्षात कोट्यवधी रुपयांच्या संशयीत अपहार व अनियमितता केलेली आहे. याप्रकरणी त्यांच्या विरोधात जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने नाशिक विभाग पातळीवर चौकशी करण्यात आली. या चौकशीत त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आले होते हे आरोप सिद्ध झाल्याने त्यांच्यावर ग्रामपंचायतीच्या कामात सचोटी व वागणूक कर्तव्यनुसार अधिन न राहता जिल्हा परिषद सेवा वर्तणूक एक नियम ३ चा भंग केला असल्याचे सिध्द झाले आहे. तसेच याप्रकरणी त्यांना सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये? याबाबत नोटीस बजावण्यात आली होती.

संबंधित नोटीसला वर्पे यांनी सादर केलेल्या खुलाशात समर्थनीय कारण सादर केलेली नाही. यामुळे त्यांचा खुलासा अमान्य करत त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आली असल्याची आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी अशिष येरेकर यांनी काढले आहेत.

वर्पे यांनी त्यांच्या कार्यकाळात देवठाण व समशेरपूर ग्रामपंचायतीमध्ये काम करतांना दरपत्रकशिवाय ग्रामनिधीचा खर्च करणे.



# धानोरे शाळेच्या चौथीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सार्व मंथन**
**सोनगाव ३० । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील उपक्रमशील, मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघेवस्ती(धानोरे) शाळेत इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांचा निरोप व शुभेच्छा समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुरीचे गटशिक्षणाधिकारी .मोहनीराज तुंबारे हे होते. तत्पूर्वी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे यांचा शाल व रोप देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता तिसरीतील विद्यार्थी आरोही अंत्रे, स्वरा शिंदे, अनुष्का दिघे, सार्थक खेमनर, अपेक्षा शिंदे, संस्कृती अंत्रे, श्रावणी दिघे, स्वरा निकम, स्वरा खेमनर, प्रणाली दिघे, दिव्या सिनारे यांनी कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व सूत्रसंचालन केले होते. चौथीचे वर्गशिक्षक . सोमनाथ अनाप यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांना मेहनत करून यश संपादन करण्यास सांगितले.

या प्रसंगी इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर व भावूक भाषणांनी आपल्या भावनांना वाट करून दिली तसेच आपल्या मनोगतातून शाळा व शिक्षक यांनी त्यांच्या शालेय जीवनात शिस्त, संस्कार व गुणवत्ता वाढीसाठी घेतलेल्या कठोर मेहनती बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# कर्जत नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी रोहिणी घुले बिनविरोध

**सार्व मंथन**
**कर्जत ३० । प्रतिनिधी**

आ. प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी रोहिणी सचिन घुले यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार रोहित पवार यांच्या गटाच्या उमेदवार सौ प्रतिभा नंदकुमार भैलुमे यांनी नगराध्यक्ष पदासाठी काल आपला उमेदवारी अर्ज भरला होता तो आज त्यांनी मागे घेतल्या मुळे सौ घुले यांची बिनविरोध निवड होणार आहे. या निवडीमुळे कर्जत नगरपंचायतवर प्रा. राम शिंदे यांनी आपले वर्चस्व निर्माण करून आ. रोहित पवार यांना पुन्हा एकदा जोरदार झटका दिला आहे.



कर्जत नगरपंचायत मधील पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षासह काँग्रेसच्या सदस्यांनी थेट सभापती राम शिंदे यांना संपर्क करून त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळात काम करण्याचे मान्य केले असून माजी नगराध्यक्ष सौ राऊत यांच्यावर अविश्वास दाखल केला होता मात्र त्यांनी बैठकीच्या अगोदरच राजीनामा दिला.

काल दि २८ एप्रिल रोजी नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत सौ घुले व सौ भैलुमे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते, मात्र आज अर्ज मागे घेण्याची मुदत ४ वाजता संपणार असताना पाच मिनिट अगोदरच भैलुमे यांनी आपला अर्ज मागे घेतला यामुळे घुले यांचा एकमेक अर्ज राहिल्याने त्याची निवड होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.


## छोट्या जाहिराती

### मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आर्युवैदिक औषधाने बरा

आयुर्वेदिक औषध, मुळव्याध, रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास यावर रामबाण उपाय, तसेच मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे खडे औषधाने विरघळतात. पोट दुखणे, कंबर दुखणे, गुडघे दुखी यावर आयुर्वेदिक रामबाण औषध मिळेल. लघवीला जळजळ, नेहमीच्या इंजेक्शनपासून सुटका, ऑपरेशनची गरज नाही, खास दुर्मिळ वनस्पतीपासून बनविलेले औषध, एकदाच औषध घेतल्यानंतर आयुष्यभर त्रास नाही. त्वचारोग व सेक्स संबंधी आयुर्वेदिक औषध उपलब्ध. एकदाच भेटा द्या. वरील आजारापासून सुटका करा.

टीप : १००% कायमचा बरा होईल.
अशोकराव पालवे, वांजुळपोई, ता. राहुरी, मो. 9370504776
(०६ एप्रिल)


## वाचकांना सूचना

सायं. दै. सार्व मंथन या वृत्तपत्रातून जाहीराती व मजकूर यांची शहनिशा करूनच वाचकांनी व्यवहार करावा. जाहीरातीतील उत्पादनाच्या संदर्भात जाहीरातदाराने जे दावे करतात, त्याची सार्व मंथन वृत्तसमुह कोणतीही हमी घेत नाही.

मो. 9325822832 /9322937487


फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 28.4.25
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार

Date : 28.4.25

| | | | |
|---|---|---|---|
| 1 128 245 489 | 6 259 358 457 | 3 120 247 256 | 8 170 279 567 |
| 2 237 390 679 | 7 160 269 368 | 4 239 347 356 | 9 180 289 478 |
| 3 580 670 689 | 8 350 369 459 | 5 140 249 348 | 0 235 370 578 |
| 4 130 239 347 | 9 126 234 469 | 6 259 358 457 | 1 290 380 470 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 138 147 156 |
| 6 367 349 790 | 1 290 380 470 | 8 125 189 459 | 3 148 346 689 |

दिनांक २९.४.२५ · दिनांक ३०.४.२५ · दिनांक १.०५.२५ · दिनांक २.०५.२५ · दिनांक ३.०५.२५

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 28.4.25
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई

100% Date Fix — FREE GAME — Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP
56 X 45
67 X 34
12 X 23

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587


मेष : आजचा दिवस कौटुंबिक सौख्य, समाधानाचा आहे. कुटुंबातील सदस्यां समवेत जास्तीत जास्त वेळ व्यतीत कराल. पाहुण्यांचे आदरातिथ्य कराल. काही महत्त्वाचे आर्थिक व्यवहारही आज पूर्ण कराल.

वृषभ : आजच्या दिवशी नाविन्यपूर्ण उत्साह, ऊर्जा, आनंद यांचा अनुभव घ्याल. आजचा दिवस आपल्यासाठी उत्तम असणार आहे. स्वतःसाठी वेळ काढाल. काही महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यावर अंमलबजावणी देखील कराल.

मिथुन : आजचा आपला दिवस काहीसा चिंतायुक्त, मनस्तापदर्शक असेल. मानसिक अस्थिरता, अस्वस्थता जाणवेल. खर्चात अनपेक्षितपणे वाढ होईल. वाहने जपून चालवावीत.

कर्क : बऱ्याच दिवसांच्या मेहनतीनंतर आजच्या दिवशी अपेक्षित लाभप्राप्ती, इच्छापूर्ती साध्य होईल. त्यामुळे सुखावून जाल. आपल्या आनंदात इतरांना सहभागी करून आनंद द्विगुणित कराल.

सिंह : आजचा आपला दिवस कर्म प्रधान असेल. आज आपल्या कामाला जास्त महत्त्व द्याल. कामाचा काहीसा तणाव आज जाणवेल. कामानिमित्त प्रवासाचे योग देखील संभवतात.

कन्या : आजचा आपला दिवस सुखमय, आनंदमय, भाग्यमय असेल. आज नशिबाची व भाग्याची साथ मिळेल. नोकरीनिमित्त काही नवीन लोकांच्या गाठीभेटी होतील. आजच्या दिवसाचा सदुपयोग करून घ्या.

तुळ : आज काही अडीअडचणींचा. संकटांचा सामना करावा लागू शकतो. आपल्या मेहनतीला, प्रयत्नांना अपेक्षित यश आज प्राप्त होणार नाही. शांत चित्त व संयमाने केवळ आपल्या नित्य कर्मावर लक्ष ठेवून आजचा दिवस व्यतीत करावा.

वृश्चिक : आज आपल्या जोडीदारासमवेत छान, मजेत वेळ व्यतीत कराल. जोडीदाराचे भरभरून प्रेम व सहकार्य लाभेल आपणही जोडीदाराच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. व्यावसायिकांसाठी देखील उत्तम दिवस असेल.

धनु : आज काहीशी चिडचिड, अस्वस्थता जाणवेल. आरोग्याच्या काही तक्रारी सतावतील. तब्येतीची काळजी घ्यावी लागेल. नोकरदार मंडळींना आज काहीसा तणाव जाणवेल.

मकर : आजचा आपला दिवस आनंदात, उत्साहात व्यतीत कराल. आज आपल्यातील कलागुणांना जोपासण्यासाठी वेळ काढाल. संतती समवेत ही अमूल्य वेळ व्यतीत कराल.

कुंभ : आज कुटुंबातील, परिवारातील सदस्यां समवेत आनंदात वेळ घालवाल. आजच्या दिवशी सौख्याची प्राप्ती होईल. घरातील काही महत्त्वाची कामे आज पूर्ण कराल. त्यात कुटुंबियांचे सहकार्य लाभेल.

मीन : आजचा दिवस कर्तृत्व, पराक्रम गाजविण्याचा दिवस आहे. आज अधिक मेहनत घेऊन आपली कामे पूर्ण करण्याकडे कल असेल. काही महत्त्वाचे व धाडसी निर्णय घ्याल.


लग्न, व्यवसाय, शिक्षण, नोकरीत येणाऱ्या अडचणी, करिअर, कोणतेही काम करताना येणारे अपयश, कर्जबाजारी होणे, कोणतेही काम पूर्ण न होणे, वास्तू दोषामुळे येणाऱ्या अडचणी व अपयश, सतत घरात कलह होणे, अडकलेले पैसे, फसवणूक यावर १००% मार्गदर्शन मिळेल.
विवाहास अडचण असेल तर एकदा नक्की मार्गदर्शन घ्या.
ऑनलाईन मार्गदर्शन उपलब्ध

संपर्क - सौ. कांचन थिटे
ज्योतिष, अंक वास्तू शास्त्र प्रवीण, विवाह (M. S. ), वास्तू तज्ञ
तडवळे रोड, नवीन एस. टी. स्टँड जवळ, कोरेगाव, सातारा
वास्तू मार्गदर्शन, विना तोडफोड वास्तुदोष जाण्यासाठी अगदी छोट्या गोष्टी आणि सोप्या उपाय योजना
| १००% रिझल्ट | एकदा नक्की सल्ला घेऊन बघा |

## थोडक्यात

### कडीकोयंडा तोडून घर फोडले

**सार्व मंथन** राहाता ३० । घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश करून चोरट्यांनी सुमारे ४६ हजाराचा मुद्देमाल लांबविल्याची घटना शिंगवे येथे घडली आहे. या प्रकरणी राहाता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.शोभा मच्छिंद्र बगे (वय ५० रा. वारी रोड, शिंगवे, ता. राहाता) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २६ एप्रिल रात्री दहा ते २७ एप्रिल पहाटे चारदरम्यान चोरट्यांनी घराचा मागील दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील सामानचा उचकापाचक करून सोन्याचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा ४६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणा राहाता पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार मंडलिक करीत आहे.

### चोरट्यांनी दुकानातील रोकड लांबविली

**सार्व मंथन** पाथर्डी ३० । दुकानाचे छत उचकटून दुकानातील रोख रक्कम साडेसात हजाराची रक्कम चोरून नेल्याची घटना पाथर्डी शहरातील मार्केट यार्डमधील दुकानात घडली आहे. याबाबत साहिल संजयकुमार लुनावत (वय ३१, धंदा किरणा दुकान, रा. वामनभाऊ नगर पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की मार्केट यार्ड येथे माझे किराणा दुकान आहे. रविवार (ता. २७) रोजी रात्री रात्री घडली. चोरट्यांनी दुकानाच्या छताचे पत्रे उचकटून दुकानात प्रवेश करून गल्ल्यातील रोख साडेसात हजाराची रक्कम लांबविली. या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल सोनवणे करीत आहेत.

### घरातील सामनाची उचकापाचक करून सव्वा तीन लाख लुटले

**सार्व मंथन** पाथर्डी ३० । घरात शिरून घरात उचकापाचक करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण तीन लाख २१ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. ही घरफोडीचा घटना पाथर्डी तालुक्यातील माळीबाभुळगाव येथे घडली आहे. याबाबत भाऊसाहेब नानाभाऊ वाळके (वय ६५, रा. माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २६ ते २७ एप्रिल दरम्यान राहात चोरट्याने शिरून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील सामनाची उचकापाचक करून घरातील सुमारे ३ लाख २१ हजार रुपये किमतेचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला आहे.

### बसमधून प्रवाशाच्या सॅकची चोरी

**सार्व मंथन** श्रीरामपूर ३० । बसमधील सॅकची चोरी केली आहे. यामुळे सॅकमधील ८५ हजाराचे सोन्याचे नेकलेस व रोख रक्कम असा सुमारे ८६ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरू नेला आहे. याबाबत प्रमिला दत्तात्रय गावडे (वय ६६, रा. पिंपळगाव बसवंत, ता. निफाड,. जि. नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शिर्डी ते छत्रपती संभाजीनगर बसमधून प्रवास करीत असताना चोरट्याने सॅकची चोरी केली. सॅकमध्ये १७ ग्रॅम वजनाचा नेकलेस व रोख रक्कम असा सुमारे ८६ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल तोडमल करीत आहेत.

### दारू न पाजल्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण

**सार्व मंथन** वांबोरी ३० । दारू पाजली नाही म्हणून अक्षय मोठे या तरुणाला शिवीगाळ करुन दगडाने मारहाण करत जखमी केल्याची घटना दि. २६ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास राहुरी येथील हॉटेल मित्र प्रेम येथे घडली. अक्षय सुनिल मोटे, वय २६ वर्षे, धंदा- ट्रान्सपोर्ट व्यवसाय, रा. गुंजाळे, ता. राहुरी, हा तरुण दि. २६ एप्रिल २०२५ रोजी रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास हॉटेल मित्रप्रेम येथे जेवण करण्यासाठी गेला. हॉटेल मित्रप्रेमचे समोर असणारे लोखंडी बाजेवर बसला असताना तेथे आरोपी सचिन नवले हा आला व मला म्हणाला की, तु मला दारु पाज. तेव्हा अक्षय मोटे त्यास म्हणाला की, माझेकडे पैसे नसल्याने मी तुला दारु पाजु शकणार नाही. याचा त्यास राग आल्याने त्याने अक्षय याला शिवीगाळ केली आणि डोक्यात दगड मारुन जखमी केले. अक्षय सुनिल मोटे याच्या फिर्यादीवरून आरोपी सचिन मारुती नवले, रा. गुंजाळे, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला.

## माजी मंत्री थोरात यांनी गुजरात येथे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांशी साधला संवाद



**सार्व मंथन**
संगमनेर ३० । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी मंत्री व काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी गुजरात मधील १२ मतदारसंघांमधील काँग्रेस कार्यकर्त्यांशी संवाद साधला असून काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानांतर्गत संविधान रक्षणासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र होऊन अधिक काम करावे असे आवाहन केले आहे.

गुजरात मधील सुरत येथे १२ मतदार संघातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भरतसिंग सोळंकी, माजी खासदार किशनभाई पटेल, माजी अध्यक्ष परिमल राणा, सुरतचे अध्यक्ष धनसुख राजपूत,कार्यकारी अध्यक्ष विपुल उदानवाला, दिनेश सावलिया, मीडिया समन्वयक कल्पेश बारोट आधी पदाधिकारी उपस्थित होते.

लोकनेते बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्रातील सुसंस्कृत, स्वच्छ प्रतिमा व एकनिष्ठ असलेले नेतृत्व आहे. महाराष्ट्रातील संगमनेर विधानसभा मतदारसंघातून आठ वेळा विक्रमी मताधिक्याने प्रतिनिधित्व करताना त्यांनी राज्य मंत्रिमंडळात महसूल, कृषी,शालेय शिक्षण, जलसंधारण,पाटबंधारे, रोजगार हमी योजना, खार जमीन अशा विविध मंत्री पदांची जबाबदारी अत्यंत सक्षमपणे सांभाळली होती. याचबरोबर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करताना अत्यंत अडचणीच्या काळामध्ये ४४ आमदार विधानसभेमध्ये निवडून आणले होते. तर २०१९ ते २४ या काळात विधिमंडळ गटनेते म्हणूनही काम केले. याचबरोबर काँग्रेसच्या अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य असून त्यांच्याकडे यापूर्वीही गुजरात निवडणुकीची जबाबदारी देण्यात आली होती.

नुकतीच आहिल्या नगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यातील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाली असून काँग्रेसने गुजरात मधील विविध मतदार संघाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. यानंतर सुरत मध्ये त्यांनी विविध कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व देश उभारणीमध्ये काँग्रेसचा महत्त्वपूर्ण वाटा असून काँग्रेस हा विचारांचा पक्ष आहे.

## शेवगावच्या विविध समस्यांप्रश्नी कृती समितीकडून रास्ता रोकोचा इशारा

**सार्व मंथन**
शेवगाव ३० । प्रतिनिधी

शेवगाव शहरातील विविध समस्यांप्रश्नी शेवगाव कृती समितीच्यावतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.,



शेवगाव शहरातील पाणी प्रश्न तसेच शेवगाव शहरातील अतिक्रमण काढल्यामुळे दगड व माती गटारीवर पडून गटारी बंद झाल्या आहेत.त्यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील आरोग्याच्या विषयांकडे नगरपरिषदकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसत असल्याचे कृती समितीने म्हंटले आहे. सदर प्रश्न मार्गी न लागल्यास ५ मे रोजी रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी अरुण मुंढे, प्रा। किसन चव्हाण, अरुण लांडे, संजय नांगरे, सुनील रासने, कमलेश गांधी, वजीर पठाण, दिगंबर काथवटे, एकनाथ कुसळकर, अशोक आहुजा, दत्तात्रय फुंदे, समीर काझी, भाऊसाहेब कोल्हे, अंकुश कुसळकर, संजय फडके, ताहेर पटेल आदींसह नागरिक उपस्थित होते.

## बीएसएनएल टॉवरजवळून दुचाकी चोरीला

**सार्व मंथन**
श्रीगोंदा ३० । प्रतिनिधी

पारगाव सुद्रिक येथील बीएसएनएल टॉवरजवळून दुचाकीची चोरी झाली आहे. ही घटना १७ ते १८ एप्रिल रोजी घडलेली आहे. याबाबत शिवाजी पांडुरंग हिरवे (वय ४५, रा. पारगाव सुद्रिक) यांनी श्रीगोंदे पोलिस ठाण्यात फिर्याद दिलेली आहे. त्यात म्हटले आहे की, पारगाव सुद्रिक येथील बीएसएनएल टॉवर जवळ दुचाकी उभी केली होती. मात्र ती कोणी तरी घेऊन गेले. दुचाकीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यामुळे फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस नाईक भागवत करीत आहेत.

## पहलगाम हल्ल्यातील अतिरेक्यांना फाशी द्यावी

**सार्व मंथन**
श्रीरामपूर ३० । प्रतिनिधी

नुकताच काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर अतिरेक्यांनी भ्याड हल्ला केला. यात २६ पर्यटक झाले. या अतिरेक्यांचा शोध घेवून त्यांना फाशीची शिक्षका द्यावी, अशी मागणी श्रीरामपूर शिवसेना महिला आघाडीच्या शहरप्रमुख सविता वाडिले व पदाधिकार्यांच्या वतीने करण्यात आली.

श्रीरामपूर तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अतिरेक्यांनी अत्यंत निर्दयीपणे या हत्या केल्या आहेत. धर्म विचारून या हत्या करण्यात आल्या. या घटनेमुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. दहशतवादाला पोसणार्या पाकिस्तानवर पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक करून त्यांना धडा शिकवावा व अतिरेक्यांचा खात्मा करावा हीच देशवासीयांची इच्छा आहे.

या घटनेतील अतिरेक्यांना शोधून त्यांना भर चौकात फाशी द्यावी, अशी मागणीही निवेदनात श्रीरामपूर शिवसेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

## पंचायत समितीच्या माजी सदस्यांवर हल्ला करणारे गजाआड

**सार्व मंथन**
पाथर्डी ३० । प्रतिनिधी

तालुक्यातील तिसगाव येथील माजी पंचायत समिती सदस्य सुनील परदेशी यांच्यावर शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या हॉटेलमध्ये आलेल्या पाच व्यक्तींनी भांडण करत चाकूने हल्ला केल्याने सुनील परदेशी या घटनेमध्ये गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना नगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी रवाना करण्यात आले . तिसगाव येथे वृद्धेश्वर चौकाजवळ सुनील परदेशी यांचे मातोश्री हॉटेल असून या हॉटेलमध्ये कैवल्य घोरपडे, ज्ञानेश्वर म्हस्के, सोमनाथ लवांडे, विशाल म्हस्के, गणेश म्हस्के आले असता बराच वेळ ते हॉटेलमध्ये बसले यामध्ये ज्ञानेश्वर म्हस्के याने हॉटेलमध्ये उलटी केली. यावेळी हॉटेलमधील कामगाराने त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्याच्या इतर सहकाऱ्यांनी जातीवाचक शिवीगाळ केली तर कैवल्य घोरपडे याने हॉटेल मालक सुनील परदेशी यांच्यावर चाकू हल्ला केला. या घटनेमध्ये परदेशी गंभीर जखमी झाल्याने त्यांना तात्काळ नगरला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. तर हल्ला करणाऱ्या सर्व आरोपींनी तिथून पळ काढला.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारांची घोषणा

**सार्व मंथन**
अहिल्यानगर ३० । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समितीने जिल्हा क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली आहे. यात सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, व २०२३-२४ या पाच वर्षाकरिता गुणवंत खेळाडू (पुरुष व महिला) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक तसेच सन २०१९-२० करिता गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/संघटक पुरस्कार्थींची निवड करण्यात आलेली आहे. पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम रुपये १० हजार असे आहे.

सन २०१९-२० च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणेः (एकूण सहा)

गुणवंत क्रीडा कार्यकर्ता / संघटक पुरस्कार - दिनेश लक्ष्मण भालेराव, जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/संघटक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार - श्री डेविड सुरेश मकासरे, (पावरलिफ्टिंग) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) सोमनाथ अविनाश सपकाळ (बेसबॉल): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी. गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) कु. अपुर्वा गोरक्ष गोरे (सायकलिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी. गुणवंत खेळाडू पुरस्कार : (दिव्यांग प्रवर्ग) श्री सुहास शंकर मोरे (मैदानी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत दिव्यांग खेळाडू पुरस्कारार्थी गुणवंत खेळाडू पुरस्कार : (थेट पुरस्कार) कु. फिजा फत्तू सय्यद (सॉफ्टबॉल) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत पुरस्कारार्थी.

सन २०२०-२१ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणेः (एकूण तीन)गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार : प्रा. डॉ. विजय लक्ष्मण म्हस्के (व्हॉलीबॉल) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग)करण संदीप गहाणडुले (मैदानी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) कु. वैष्णवी सुनील गोडळकर (तलवारबाजी) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी. सन २०२१-२२ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणेः (एकूण तीन)गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार : प्रा. विजय यशवंत देशमुख (वेटलिफ्टिंग) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी. गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग)श्रीनिवास शिवाजी कराळे (मैदानी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग)कु. विश्वेशा विजयसिंह मिस्कीन (मैदानी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी. सन २०२२-२३ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणेः (एकूण तीन)गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार :श्रीरामसेतू सुधाकर आवारी (मैदानी) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग)ओम बाबासाहेब करांडे (सायकलिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) कु. कोमल नारायण वाकळे (वेटलिफ्टिंग): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.


## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या; अहमदनगर

दुसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता. जिल्हा अ.नगर. ४१४ ००१
फोन : (०२४१) २३२६९१४. E-mail : ahmednagarfederation@gmail.com
जा.क्र. पतसंस्था/फेडरेशन/४७/२०२५ दिनांक २८/०४/२०२५

### स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

नमुना 'झेड'
(नियम १०७ पोट-नियम (११ (ड-१) पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी शिवांकुर अर्बन को-ऑप के. सोसा. लि. राहुरी, ता. राहुरी, जिल्हा, अ. नगर व्दाराः अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या; अ. नगर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला / तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. १७/०३/२०२५ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये. आणि व्यवहार केल्यास शिवांकुर अर्बन को-ऑफ क्रे. सोसा.लि. राहुरी, ता. राहुरी, जिल्हा, अ. नगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

| अ.नं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | चतु:सिमा पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार-सोमनाथ बाळासाहेब लांबे करिता जामि-बाबासाहेब भाऊसाहेब होडगर यांची मिळकत | दावा रक्कम रू. १४२८६३६/- दि. ०९/१२/२०२३ पासून १५ % व्याज+इतर खर्च | मागणी नो. दि. १०/०५/२०२४ जप्ती नो.दि. ०३/१०/२०२४ | पिंप्री अवघड | २५९/१ | १.८१ | मूळ नकाशाप्रमाणे |
| | जामि-बाबासाहेब भाऊसाहेब होडगर यांची मिळकत | | | पिंप्री अवघड | २५९/१ | १.८१ | |
| २. | कर्जदार-सागर गणेश दौंड करिता जामि-शिवाजी नानाभाऊ ठाणगे यांची मिळकत | दावा रक्कम रू. ६८८५६/- दि. ०९/१२/२०२३ पासून १५ % व्याज+इतर खर्च | मागणी नो. दि. १०/०५/२०२४ जप्ती नो.दि. ०३/१०/२०२४ | कात्रड राहुरी | ६९४/१/२ ७३४/२ | ०.६३ ०.२२ | मूळ नकाशाप्रमाणे |

दिनांक : २८/०४/२०२५
स्थळ : अ. नगर

शिक्का

सही/-
(बी. पी. पवार)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या; अहमदनगर.


## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांना जेरबंद करा

### राहुरी तहसीलवर भारत बचाव जनआक्रोश मोर्चात संघटनेंची मागणी

**सार्व मंथन**
राहुरी ३० । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याच्या घटनेला एक महिना उलटून देखील अद्याप आरोपी अटक नाही. तसेच केंद्र सरकारकडून वक्फ बोर्ड व इतर काही नवीन कायदे करण्यात येत आहे. या विरोधात सोमवार दि. २८ एप्रिल रोजी लोकशाही बचाव समन्वयक समितीच्या वतीने राहुरी येथील तहसील कार्यालयावर भारत बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



शहरातील वायएमसीए ग्राऊंड येथून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. धावडे पेट्रोल पंप ते शुक्लेश्वर चौक ते पृथ्वी कॉर्नर ते शनीचौक ते तहसिल कार्यालय या मार्गे मोर्चा नेण्यात आला. यावेळी आरपीआयचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रवीण लोखंडे, वंचित बहुजन आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अनिल जाधव, वंचितचे तालुकाध्यक्ष संतोष चोळके, भीम आर्मी जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल, डॉ. जाकिर सय्यद आदिंनी मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र जन सुरक्षा अधिनियम २०२४ हा कायदा रद्द करावा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केलेल्या आरोपींना तात्काळ अटक करावी. ॲट्रोसीटी अंतर्गत गुन्हे दाखल करणाऱ्यांवर दरोडा, चोरी व पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येतात. त्याची खात्री केल्या शिवाय कारवाई होऊ नये. तसेच वक्फ संशोधन बील २०२५ मागे घेण्यात यावे. अशी एकमुखी मागणी यावेळी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली.

यावेळी आरपीआयचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रवीण लोखंडे, वंचित बहुजन आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अनिल जाधव, तानसेन बिवाल, विलास नाना साळवे, असलम शेख, संतोष चोळके, डॉ. साजिद, बाबासाहेब साळवे, रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव, योगेश पवार, यमुनाताई भालेराव, दिपक साळवे, पिंटूनाना साळवे, संतोष चोळके, इम्रान सय्यद, बाबा साठे, नंदू शिंदे, भाऊसाहेब पगारे, दत्ता जोगदंड, आयुब खान पठाण, कैलास पवार, गोविंद जाधव, अशोक कर्डे, सत्तार शेख, मुखतार इनामदार, धम्म मेघा जाधव, अनिता जगधने, किशोर भालेराव, मिरझा अफसर बेग, गंगाधर विधाटे, किरण साळवे, दादु साळवे, उत्तम साळवे, करण साळवे, दिलीप बर्डे, जालिंदर गायकवाड, राजु मुंतोडे, रवींद्र शिरसाठ, नविन साळवे, सुनिल चांदणे, आनंद जाधव, रफिक इनामदार, गोरख दिवे, जाकीर सय्यद, सादिक शेख, निसार पिंजारी, राजु कसबे, योगेश साळवे यासह शेकडो कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते.

तर आरपीआय आठवले गट, वंचित बहुजन आघाडी, भीम आर्मी, रिपब्लिकन युवा सेना, बहुजन युथ पँथर, एकलव्य आदीवासी आघाडी, जयभीम मित्रमंडळ राजवाडा, मुस्लिम समाज आघाडी, राष्ट्रीय दलित न्याय हक्क आंदोलन, सत्यशोधक लहुजी क्रांती सेना, मानव अधिकार संरक्षण समिती, भीम आर्मी स्टुडंट्स फेडरेशन तसेच इतर समविचारी सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बबन साळवे यांनी केले.

FinOlex PIPES
घर बांधताय...!
नगर जिल्ह्यात सर्वात कमी दरात फिनोलेक्स मटेरियल!
तर मग चला, प्लंबिंग पी.व्हि.सी सॅनिटरी आणि टाईल्स करिता...
सुनिल सेल्स कॉर्पोरेशन
बारागाव नांदूर रोड, राहुरी, जि. अ.नगर
। प्रोप्रा. सुनिल भट्टड ९८२२ ४२८६९९ । विजय भट्टड ९८९०४३३४१०

सायं. दैनिक
सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५



शितल एअर कंडीशनर्स
डिप फ्रिज, वॉटर कुलर, ए.सी.
VOLTAS beko
* शाखा १ * खंडोबा मंदिराजवळ, नगर रोड, राहुरी
शाखा २ * शिक्षक बँकेजवळ, बस स्टॅण्डसमोर, राहुरी
9822207817, 9822518840, 8380096002

## मंथन फटकारे

**अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे, मो. ९५०३९५९९५७**

राहुरी विद्यापीठाच्या रसवंतीमध्ये निकृष्ट उसाचा वापर–वृत

– विद्यापीठामध्ये कोणते काम उत्कृष्ट आहे? याचा शोध घ्यावा लागेल!रसवंती सुरु केली, पण त्यामध्ये‘स्वार्थ‘साधण्याचं काम चालू आहे!

शेतकऱ्यांचे पैसे थकविणाऱ्या कारखान्यांवर कारवाई–वृत

– असे अनेक कारखाने आहेत, राहुरी सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जोरात सुरु झालीय, कारखान्यावर कर्ज आहे, पण‘मालमत्ता‘लक्षात घेऊन‘अनेक जण‘गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत!

बाबासाहेबांनी स्त्रियांना हक्कांची जाणीव करून दिली–मिसाळ

– हे आपण मान्य करता, त्याबद्दल आपले अभिनंदन!पण आजही अनेक स्त्रिया अंधश्रद्धेच्या बाहेर यायला तयार नाहीत! महात्मा फुलेंनी आपल्याला साखळदंडातून बाहेर काढलं याची पण‘त्यांना‘जाणीव नाही!

सिंधू नदीचे पाणी अडवण्याचा भारताचा निर्णय योग्य– हजारे

–अण्णा बोलले बर का?पण बोलताना त्यांनी‘भान‘ठेवलं, फक्त सरकारच्या बाजूनेच बोलले, नको काही विघ्न?

कर्जत मध्ये रोहित पवारांना धक्का–वृत

– पूर्ण देशात पवारांना‘धक्का‘बसलाय, तिथे रोहित पवारच काय घेऊन बसला? रोहित पवार‘कदाचित‘पुढच्या पंचवार्षिक ला माहेरघरी जातील?

### गोदावरीतून सिंचन आणि बिगर सिंचनाचे

# आजपासून एकत्रित आवर्तन

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

**सार्व मंथन**
**शिर्डी ३० । प्रतिनिधी**



गोदावरी लाभक्षेत्राकरीता डाव्या आणि उजव्या कालव्यातून सिंचन आणि बिगर सिंचनाचे एकत्रित आवर्तन बुधवार दिनांक ३० एप्रिल २०२५ पासून सोडण्याच्या सुचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या आधिकाऱ्यांना दिल्या.

या संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या आधिकाऱ्यां समवेत चर्चा करुन, लाभक्षेत्रात पाण्याची असलेली वाढती मागणी तसेच उन्हाची वाढलेली तिव्रता लक्षात घेवून शेतीच्या पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तनाचे नियोजन करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या आहेत. त्यानुसार जलसंपदा विभागाने दिनांक ३० एप्रिल २०२५ ते १ जून २०२५ दरम्यान सिंचन व बिगर सिंचनाचे एकत्रित आवर्तन सोडण्याचे नियोजन केले आहे.

लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची मागणी आणि उन्हाची वाढलेली तिव्रता लक्षात घेवून आवर्तन सोडण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे ना.विखे पाटील म्हणाले. या आवर्तनाचा लाभ रब्बी पिकांना होणार असून, या बरोबरीने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे. उन्हाची तिव्रता वाढल्याने काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्याही निर्माण झाली आहे. या आवर्तनाचा या गावांनाही लाभ व्हावा या उद्देशाने सिंचन आणि बिगर सिंचन असे एकत्रित आवर्तन सोडण्याच्या सुचना मंत्री विखे पाटील यांनी विभागाला दिल्या आहेत

उन्हाची वाढती तिव्रता लक्षात घेवून पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता जलसंपदा विभागाच्या आधिकाऱ्यांनी घ्यावी, तसेच शेतकऱ्यांनीही पाण्याचा योग्य विनीयोग करावा असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

# सोनईत कोयता गँगच्या हल्ल्यात तरुण जखमी

**सार्व मंथन**
**सोनई ३० । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील सोनईतील गजबजलेल्या शिवाजी चौकात दिनांक २७ च्या रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान कोयता गॅंगने केलेल्या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला उच्चारासाठी अहिल्या नगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिवसेंदिवस कोयता गॅंग ची दहशत वाढत असून पोलीस प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. या आधी सुद्धा गंभीर गुन्ह्याची नोंद असून याला कुठेतरी आवर घातला जावा अशी मागणी केली जात आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

या बाबत पोलीस सूत्रांकडून समजलेल्या माहितीनुसार दि. २७ रोजी फिर्यादी अक्षय बाबासाहेब शेटे (वय.२७) हे नेहमी प्रमाणे आपल्या घराकडे जात होते. त्यावेळी रस्त्यावर एका महिलेला अपघात झाला होता. संबंधित व्यक्तीला या मध्ये तुझी चुक आहे तु त्यांची माफी माग असे म्हणाले त्याचा राग आरोपीला आल्याने तु इथुन निघून जा नाही तर तुझ्या कडे बघतो असा दम दिला. त्यानंतर रात्री ८.३० वाजता शेटे हे त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुचाकी वर आपल्या मित्रांसोबत बसलेले होते.

# बोगस कर्जमाफी प्रकरणी विखेंसह ५४ जणांवर गुन्हा दाखल

## ‘सर्वोच्च’चा आदेशाची अंमलबजावणी

**सार्व मंथन**
**लोणी ३० । प्रतिनिधी**

प्रवरानगर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यात साडेआठ कोटींच्या बोगस कर्जमाफी प्रकरणी आजी–माजी संचालक, साखर आयुक्त पुणे, संबंधित दोन बँकांचे अधिकारी अशा एकूण ५४ जणांवर लोणी पोलीस ठाण्यात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती लोणीचे सहा. पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी दिली. विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने सन २००४ ते २००६ या गळीत हंगामामध्ये सभासद शेतकर्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून एकूण ८ कोटी ८६ लाख १२ हजार २०६ बेसल डोस कर्ज काढले. त्यानंतर सन २००७ मध्ये झालेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ प्राप्त करून घेत आर्थिक अफरातफर केल्याचे व शासनाची फसवणूक केल्याची तक्रार बाळासाहेब केरुनाथ विखे (रा.लोणी बुद्रुक, ता. राहाता) यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे कारखान्यावर निर्विवाद वर्चस्व आहे. सन २००४–२००५ व २००५–२००६ मध्ये बनावट कागदपत्रे करून बेसल डोस कर्जाचा प्रस्ताव तयार करून सदर प्रस्ताव युनियन बँक व बँक ऑफ इंडिया झोनल ऑफीस पुणे यांच्याकडून अधिकार्यांशी संगनमत करून अनुक्रमे ३ कोटी ११ लाख ६० हजार ९८६ व ५ कोटी ७४ लाख ४२ हजार २२० रुपये कर्ज मंजूर करून घेतले. परंतु शेतकरी सभासदांच्या नावे कर्ज मंजूर केले असले तरी प्रत्यक्षात सदर कर्जाची रक्कम सभासद शेतकर्यांना देण्यात आली नाही. सदर रकमेचा बेकायदेशीर आर्थिक लाभ मिळविला.

शासनाची फसवणूक करुन कर्जमाफी योजनेस पात्र नसतानाही कर्जमाफी प्राप्त करून फौजदारी स्वरुपाचा गुन्हा केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सदर कारखान्याच्या संचालक मंडळाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाने दि. १८ मार्च २०२५ रोजी राहाता कोर्टाने यापूर्वी दिलेल्या निर्णय कायम ठेवून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

# तनपुरेंनी किराणा दुकानाची उधारी मागितली म्हणून धसाळ बंधूकडून मारहाण

## राहुरीतील वाघाचा आखाडा येथील घटना

**सार्व मंथन**
**राहुरी ३० । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील वाघाचा आखाडा येथे किराणा दुकानदाराने उधारी मागितली म्हणून दोघा भावांनी दुकानदारावर चाकूने हल्ला करत शिवीगाळ व लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना दि. २५ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास घडली.

रविंद्र विठ्ठल तनपुरे, वय ४२ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील वाघाचा आखाडा येथे राहाता असून त्यांचे तेथे आर्यन किराणा स्टोअर नावाचे दुकान आहे. दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास रविंद्र तनपूरे हे त्यांच्या आर्यन किराणा स्टोअर्स दुकानात होते. तेथे आरोपी प्रविण धसाळ हा आला.

तेव्हा रविंद्र तनपूरे यांनी त्यास किराणा दुकानातुन उधारीवर नेलेल्या सामानाची उधारी मागीतली. त्याचा राग आल्याने त्याने रविंद्र तनपूरे यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्याच वेळी आरोपी दिपक धसाळ हा आला. त्याने रविंद्र तनपूरे यांच्यावर चाकूने वार करून त्यांना जखमी केले. तसेच तु जर आम्हाला पुन्हा उधारी मागीतली तर तुला जिवे मारुन टाकु अशी धमकी दिली.

घटने नंतर रविंद्र विठ्ठल तनपुरे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी प्रविण बाप्पुसाहेब धसाळ व दिपक बाप्पुसाहेब धसाळ, दोघे रा. वाघाचा आखाडा, ता. राहुरी, या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.



# हद्दपार आरोपी आकाश लष्करेला पोलिसांनी केले गजाआड

**सार्व मंथन**
**नेवासा ३० । प्रतिनिधी**

दिनांक २६. ०४. २०२५ रोजी १३.०० वाजता परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांचे पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, पोकों/सुमित करंजकर, पोकों/नारायण डमाळे असे नेवासा फाटा ते नेवासा खुर्द शहर जाणारे हायवेवर गोटार सायकलवर पेट्रोलिंग करत असताना बालाजी सेल्स कार्पोरेशनच्या भारत पेट्रोलपंपावर मुंबई पोलीस कायदा कलम ५६(१) (अ) (ब) प्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातीचे सिमेतून ०२ वर्षांकरीता हद्दपार केलेला ईसम नामे आकाश ऊर्फ देवा जालीदर लष्करे. नेवासा जि. अहिल्यानगर हा दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन नेवासा येथे आणण्यात आले.

तद्नंतर सदर ईसम नामे आकाश ऊर्फ देवा जालींदर लष्करे रा. नेवासा जि. अहिल्यानगर बालाजी सेल्स कार्पोरेशनच्या भारत पेट्रोलपंप नेवासा खुर्द ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथे मिळून आल्याने त्याचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

तरी यापुढे असे हद्दपार केलेले आरोपीतांनी सावध होवुन जावे नाहीतर त्यांचेविरुध्द अशा प्रकारचे गुन्हे दाखल करून त्यांचेविरुध्द कठोरात कठोर अथवा हद्दपार किंवा चझ्रुअ कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात येईल असा इशारा प्रशिक्षणार्थी आय पी एस संतोश खाडे यांनी दिला आहे.

सदरची कारवाई राकेश ओला पोलीस अधीक्षक अहमदनगर, वैभव कलुबर्मे अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपुर व उप विभागीय पो. अधिकारी सुनिल पाटील शेवगाव उपविभाग यांचे सुचना मागदर्शनाखाली नेवासा पोलीस स्टेशनचे परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक संतोष आ. खाडे यांनी व त्यांचे पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, पोहेकॉ अजय साठे, पोकों/ सुमित करंजकर, पोकों/ नारायण डमाळे, पोकॉ/श्रीनाथ गवळी, पोकों/अरविंद वैद्य यांनी केलेली आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न; गुन्हा दाखल

## पुढील अनर्थ टळला

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर ३० । प्रतिनिधी**

शासकीय कार्यालयातून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याच्या कारणातून पोलीस अधीक्षक कार्यालयात ज्वलनशील पदार्थ अंगावर ओतून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किसान दादा शिंदे (वय ३८, रा. भेंडा, ता. नेवासा), असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना रविवारी (ता. २७) रोजी रात्री उशिरा घडली.

याबाबत माहिती अशी की, किसन शिंदे यांचे नातेवाईकांशी भूखंडवादावरून वाद सुरू आहे. यासंदर्भात शासकीय कार्यालयातून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून घेतले. दरम्यान कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी शिंदे यांना पकडले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेचा पुढील तपास पोलीस रवी टकले हे करत आहेत.



# राहुरीचे धनंजय पानसंबळ यांना डॉक्टरेट

**सार्व मंथन**
**राहुरी ३० । प्रतिनिधी**

सामाजिक कामात कायम पुढाकार असलेले राहुरीच्या लाईफ इन हॉस्पिटलचे धनंजय शिवाजीराव पानसंबळ यांना ‘एशिया इंटरनॅशनल रिसर्च युनिव्हर्सिटी’ (महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्य) यांच्याकडून बंगलोर येथे मान्यवरांच्या हस्ते डॉक्टरेट ही पदवी बहाल करून सन्मानित करण्यात आले.

धनंजय पानसंबळ यांनी ग्रामीण भागातील रुग्णाची अडचण लक्षात घेत राहुरी शहरामध्ये अद्यावत, प्रशस्त व सर्व सोयीनियुक्त असे ‘लाईफ इन हॉस्पिटलची‘ उभारणी केली .त्यामध्ये गोरगरीब रुग्णांना मोठ्या शस्त्रक्रिया, विविध रोगांवरील उपचार उपबद्ध करून दिले.

किडनी डायलेसिस करण्यासाठी शहराच्या बाहेर जावे लागत असल्याने रुग्णांची होणारी परवड थांबण्यासाठी धनंजय पानसंबळ यांनी राहुरी शहरांमध्ये २४ तास निरंतर सेवा देणार‘लाईफ इन हॉस्पिटल‘ मल्हारवाडी रोड येथे सुरू करून महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजना मार्फत केले जाणारे सर्व उपचार राहुरी मध्येच सुरू करून रुग्णांची गैरसोय दूर केली. आजमितीला या हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे २० ते २२ डायलिसिस रोज मोफत केले जातात.तसेच अनेक वर्षांपासून ग्रामीण व दुर्गम भागात सर्वरोग निदान शिबीर घेऊन सर्वसामान्य जनतेला सेवा करण्याचे काम धनंजय पानसंबळ यांनी केले.

> वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल धनंजय पानसंबळ यांना सन २०२३ मध्ये दिल्ली येथे तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री भारती पवार यांच्या हस्ते‘‘राष्ट्रीय समाज भूषण २०२३‘‘ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

### माजीमंत्री थोरातांच्या नेतृत्वाखाली

# कारखाना निवडणूक बिनविरोध

**सार्व मंथन**
**संगमनेर ३० । प्रतिनिधी**

काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशातील सहकारासाठी आदर्श ठरलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची २०२५–२०३० या पंचवार्षिक कार्यकाळाची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर कारखान्यासह संगमनेरच्या सहकाराची वाटचाल सुरू आहे. सहकारातून ग्रामीण भागात सह शहरात समृद्धी निर्माण झाली असून संगमनेरचा सहकार हा देशासाठी मार्गदर्शक ठरला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर कारखाना निवडणुकीला मोठे महत्त्व प्राप्त झाले होते मात्र तालुक्यातील सभासद सर्वसामान्य नागरिक व जनतेने कायम लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला असून त्यांच्या मार्गदर्शनाखालील शेतकरी विकास मंडळाच्या सर्व जागा बिनविरोध झाल्या आहेत. सन २०२५–२०३० या पंचवार्षिक निवडणुकीत लोकशाही पद्धतीने तालुक्यातील १३३ सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले. मात्र सर्वांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेतकरी विकास मंडळांनी दिलेल्या उमेदवारांसाठी इतरांनी सुसंस्कृत राजकारणाची परंपरा कायम ठेवत आपले अर्ज मागे घेतले होते. विरोधकांनी ही एक तालुका एक परिवार ही परंपरा जपत आपले अर्ज मागे घेतले.

# संगमनेरात डॉ. वनकरांचा लाईव्ह कॉन्सर्ट

## डॉ. थोरात; यशोधनच्या मैदानावर शिवराय ते भीमराव गीतांमधून जागर महामानवांचा



**सार्व मंथन**
**संगमनेर ३० । प्रतिनिधी**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने दि. १ मे २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजतायशोधन कार्यालयाच्या मैदानावर संयुक्त जयंती महोत्सव सोहळा कार्यक्रमात डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा लाईव्ह कॉन्सर्ट होणार असल्याची माहिती तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी दिली आहे.

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो. यावर्षीही या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त दिनांक १ मे रोजी यशोधन जवळील मैदानावर संगमनेर काँग्रेस, युवा काँग्रेस, बहुजन विचार मंच, छत्रपती प्रतिष्ठान व विविध पुरोगामी संघटनांच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा शिवराय ते भीमराव जागर महामानवांचा हा गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमासाठी भव्य दिव्य स्टेज, एलईडी, लाईट व्यवस्था, साऊंड सिस्टिम, सुमारे ४००० नागरिकांची बैठक व्यवस्था, महिला व पुरुष स्वतंत्र बैठक, पार्किंग व्यवस्था अशी सर्व अत्याधुनिक सुविधा करण्यात आली आहे.

यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत .

तालुक्यातील सर्व नागरिक युवक महिला यांनी मोठ्या संख्येने या लाईव्ह कॉन्सर्ट कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन युवक काँग्रेस, बहुजन विचार मंच, रिपाई, दलित पँथर, छत्रपती प्रतिष्ठान व पुरोगामी संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रख्यात शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीतांसह छत्रपती शिवाजी महाराज ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील विविध प्रबोधन पर गीतांचा कार्यक्रम लाईव्ह कॉन्सर्टमधून होणार आहे. यावेळी राज्यभरातील विविध गायकांसह १०० कलाकारांच्या संचात हा कार्यक्रम होणार आहे.

सायं. दैनिक
सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक अनिल गंगाधर कोळसे यांनी यांच्या स्वराज प्रेस ॲण्ड प्रिंटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.) येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596